# “मुख्यमंत्री वयोश्री योजना”

- राज्यातील वय ६५ वर्षे व त्यावरील ज्येष्ठ नागरिकांना त्यांच्या दैनंदिन जीवनात सामान्य स्थितीत जगण्यासाठी आणि त्यांना वयोमानपरत्वे येणारे दिव्यांगत्व, अशक्तपणा यावर उपाययोजना करण्यासाठी आवश्यक सहाय्य साधने/ उपकरणे खरेदी करणेकरीता, तसेच मन:स्वास्थ केंद्र,योगोपचार केंद्र इत्यादी व्दारे त्यांचे मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी राज्यात**“मुख्यमंत्री वयोश्री योजना”राबविण्यास शासन निर्णय दि. ६.२.२०२४ अन्वये मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.**
- सदर योजनेंतर्गत पात्र लाभार्थ्यांना थेट लाभ वितरण प्रणालीव्दारे एकवेळ एकरकमी रु.३०००/- च्या मर्यादेत लाभ देय आहे. (साधने/उपकरणे खरेदी करण्यासाठी किंवा मानसिक स्वास्थ अबाधित ठेवण्यासाठी प्रबोधन व प्रशिक्षणाकरिता अनुदान )
- मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या शासन निर्णयामध्ये सुधारणा होणेबाबत आयुक्तालयाचे पत्र दि. १५.०२.२०२४ अन्वये शासनास सादर करण्यात आले आहे.
- योजनेच्या अंमलबजावणीसाठी दि. १६.०२.२०२४ चे पत्रान्वयेप्रपत्रासह क्षेत्रीय स्तरावर करावयाच्या कार्यवाहीबाबत संबधित कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानूसार कार्यवाही सुरु आहे.
- **मुख्यमंत्री वयोश्री योजनेच्या पात्र लाभार्थ्यांना निधीचे वितरण ऑनलाईन पध्दती ऐवजी ऑफलाईन पध्दतीने करण्याबाबत शासन निर्णय दि. ११.०३.२०२४ अन्वये मान्यता देण्यात आली आहे.** त्याअनुषंगाने परिपूर्ण प्रस्ताव सादर करणेबाबत आयुक्तालयाचे पत्र दि.१८.०३.२०२४ व २६.०३.२०२४ अन्वये क्षेत्रीय कार्यालयांना सूचना दिल्या आहेत.
- शासन पत्र दिनांक ९.०८.२०२४ नूसार महाडिबीटी मार्फत निधी वितरण व विनियोग करण्यासाठी स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेत स्वतंत्र चालू बँक खाते उघडण्यास निर्देश प्राप्त आहेत. त्याअनुषंगाने स्टेट बँक ऑफ इंडिया, मुख्य शाखा, पुणे येथे मुख्यमंत्री वयोश्री योजना या नावाने दिनांक १३.०८.२०२४ रोजी बँक खाते (खाते क्र. ४३२५१०३९७३६) उघडण्यात आले असून त्याबाबतचा अहवाल दिनांक १९.०८.२०२४ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे.
- **आयुक्तालयाचे पत्र दि.१०.०९.२०२४ अन्वये सदर योजनेच्या जाहिरात व प्रसिध्दीसाठी प्रत्येक जिल्हास्तरावर रु.५.०० लक्ष प्रमाणे एकुण ३६ जिल्ह्यांसाठी रु.१.८० कोटी निधी मागणी २२३५- बी ३१६ (२६- जाहिरात व प्रसिध्दी) लेखाशिर्षांतर्गत शासनास सादर करण्यात आली आहे.**
- शासन निर्णय दिनांक १९.०८.२०२४ अन्वये योजनेचे निकष व अंमलबजावणीच्या अनुषंगाने सुधारणा करण्यात आल्या असून त्यानूसार दिनांक २२.०८.२०२४ रोजी क्षेत्रिय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत.
- मुख्यमंत्री वयोश्री योजनेसाठी स्वतंत्र ईमेल आयडी कार्यान्वित केलेला आहे. तो पुढीलप्रमाणे - **cmvayoshree@gmail.com**
- दि.**७.०४.२०२५** रोजी क्षेत्रीय कार्यालयांकडून कार्यवाही झाल्यानुसार योजनेच्या पोर्टल व गुगलशीटवरील तपशील (महाआयटी कडून प्राप्त) खालीलप्रमाणे :-

| प्रस्तावांचा तपशिल (सर्व ३६ जिल्हे) | | पोर्टलवर डेटा अपलोड केलेले अर्ज संख्या | आधार प्रमाणीकरण पूर्ण झालेले अर्ज संख्या | रु.३०००/- प्रमाणे लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या | खर्च |
|---|---|---|---|---|---|
| एकुण प्राप्त | पात्र | | | | |
| **२०,७६,८३०** | **१६,८०,६६९** | **१४,३२,४७४** | **८,६२,२८०** | **५,१२,११३** | **१५३.६३** |

- सदर योजनेंतर्गत (२२३५-१४३२) अंतर्गत शासन ज्ञापन दि.२१.०८.२०२४, दि. ७.१०.२०२४ व दि.११.१०.२०२४,२७.०१.२०२५, २६.०३.२०२५ व दि.३१.०३.२०२५ अन्वये मंजूर रु. २२३ कोटी ६३ लक्ष ४० हजार इतका निधी खर्च करण्यास मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे.
- दिनांक ७.०४.२०२५ रोजी सदर योजनेंतर्गत संपूर्ण राज्यातील आधार प्रमाणीकरण झालेले ५,१२,११३ पात्र लाभार्थ्यांचे बँक खात्यावर डीबीटी प्रणालीव्दारे प्रति लाभार्थी रु. ३०००/- प्रमाणे रु. १५३.६३ कोटी निधी वर्ग करण्यात आला आहे.

- **सदर वर्ग केलेल्या लाभार्थ्यांमधून प्रत्यक्षात निधी वितरीत झालेल्या लाभार्थ्यांचा तपशील -**

| अ. क्र. | अनुदान वितरणाचा दिनांक | अनुदान वितरणाची रक्कम (रु. कोटी) | लाभार्थी संख्या | प्रत्यक्षात अनुदान जमा लाभार्थी संख्या | Failed transaction | महाआयटी कडे प्रलंबित (technical error) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २७.०८.२०२४<br>१०.१०.२०२४ | ५०.०० | ४०२२० | ३५८६० | ४३६० | ० |
| २ | १४.१०.२०२४ | ७३.६३४० | ३७१८९३ | ३२९९५० | ४१४९३ | ० |
| ३ | १३.०२.२०२५ | ३०.०० | १००००० | ८८२०३ | ११७९७ | ० |
| ४ | २६.०३.२०२५ | ४०.०० | ० | ० | ० | ० |
| ५ | ३१.०३.२०२५ | ३०.०० | ० | ० | ० | ० |
| **एकुण** | | **२२३.६३४०** | **५१२११३** | **४५४०१३** | **५७६५०** | **०** |

- तथापि, राज्यातील एकूण पात्र लाभार्थी १६,८०,६६९ पैकी ५,१२,११३ लाभार्थीना विवरणपत्रातील अनुक्रमांक १ ते ३ नूसार रु. १५३.६३४० कोटी रक्कमेचा लाभ वितरीत करण्यात आला आहे. तसेच अनुक्रमांक ४ व ५ मधील आहरीत रु. ७०.०० कोटी रक्कमेतून उर्वरीत २,३३,३३३ पात्र लाभार्थ्यांना लाभ देण्याची कार्यवाही सुरु आहे. तसेच राज्यातील एकूण उर्वरीत पात्र लाभार्थी ९,३५,२२३ चे आधार प्रमाणीकरण होणेच्या अधीन राहून सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात रु. २८०.५७ कोटी इतक्या निधीची आवश्यकता आहे.

- शासन पत्र दि. १८.१०.२०२४ अन्वये राज्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या आदर्श आचारसंहिता लागू कालावधीत योजनेअंतर्गत प्रस्ताव प्राप्त करुन घेणेसह अनुदान वितरणाची कार्यवाही स्थगित करण्यात आली आहे. त्याअनुषंगाने सद्यस्थितीत आचारसंहितेचा कालावधी संपले कारणाने योजनेअंतर्गत करावयाच्या कार्यवाहीबाबत शासन स्तरावरुन मार्गदर्शनपर निर्देश होणेस विनंती आहे.

***